मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# महापालिकेला 'एसईआयएए'चा दणका!

## पवना नदीची महापालिका हद्दीतील लांबी २४.३४ किलोमीटर

**। पिंपरी-चिंचवड।**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी या नद्यांचे पुनरुज्जीवन करताना नदीची वहन क्षमता कमी होता कामा नये, नदीचे शुद्धीकरण झाले पाहिजे, पर्यावरणीय समतोल साधला जाईल, याची काळजी घ्यावी. त्याबाबत केंद्रीय जल आणि ऊर्जा संशोधन केंद्र (सीडब्ल्यूपीआरएस) यांच्याकडून पडताळणी करून नव्याने अर्ज सादर करण्याचे निर्देश राज्य पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाने (एसईआयएए) महापालिकेला दिले आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या तीन नद्या वाहतात. पवना नदीची महापालिका हद्दीतील लांबी २४.३४ किलोमीटर, इंद्रायणी नदीची एकूण लांबी २०.८५ किलोमीटर आहे. तर, मुळा नदी शहराच्या सीमेवरून दहा किलोमीटर अंतर वाहते. तीनही नद्यांसाठी एकूण तीन हजार ५०६ कोटींचा खर्च महापालिका करणार आहे. या प्रकल्पातील पहिल्या टप्प्याच्या खर्चासाठी महापालिकेने दोनशे कोटींचे कर्जरोखे २७ जुलै २०२३ रोजी काढले आहे. वाकड बायपास ते सांगवी पुलापर्यंतच्या मुळा नदीच्या विकासासाठी हा निधी वापरण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविण्यासाठी राज्य शासनाच्या राज्य पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाची (एसईआयएए) मंजुरी आवश्यक आहे. त्यासाठी महापालिकेने परवानगीचा अर्ज केला होता. परंतु, तो फेटाळण्यात आला. नदीचे पुनरुज्जीवन करताना पूर पातळी वाढणार नाही. भारतीय मानकशास्त्राचे पालन करावे. नदीची वहन क्षमता कमी होता कामा नये, नदीचे शुद्धीकरण झाले पाहिजे. पर्यावरणीय समतोल साधला जाईल, याबाबत केंद्रीय जल व ऊर्जा संशोधन केंद्र यांच्याकडून पडताळणी करावी. त्यानंतरच अर्ज मंजुरीसाठी पाठविण्याची सूचना 'एसईआयएए'ने केली. त्यानुसार महापालिकेने पडताळणी करून घेतली असून, मान्यतेसाठी अर्ज केला जाणार आहे. पर्यावरण अभ्यासक सारंग यादवाडकर म्हणाले की, 'सीडब्ल्यूपीआरएस' यांच्याकडून पडताळणी करून घेतल्यामुळे नदी पुनरुज्जीवनामध्ये त्रुटी राहणार नाहीत. या निर्णयाचे स्वागत करतो.पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी म्हणाले की, 'एसईआयएए'ने सांगितल्याप्रमाणे त्रुटींची पूर्तता केली आहे. 'सीडब्ल्यूपीआरएस' यांच्याकडून पडताळणी करून घेतली आहे. त्यानुसार मंजुरीसाठी अर्ज केला जाईल.



### दोनशे कोटींचे कर्जरोखे काढले

» केंद्रीय जल आणि ऊर्जा संशोधन केंद्र (सीडब्ल्यूपीआरएस) यांच्याकडून पडताळणी करून नव्याने अर्ज सादर करण्याचे निर्देश राज्य पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाने (एसईआयएए) महापालिकेला दिले आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या तीन नद्या वाहतात. पवना नदीची महापालिका हद्दीतील लांबी २४.३४ किलोमीटर, इंद्रायणी नदीची एकूण लांबी २०.८५ किलोमीटर आहे. तर, मुळा नदी शहराच्या सीमेवरून दहा किलोमीटर अंतर वाहते. तीनही नद्यांसाठी एकूण तीन हजार ५०६ कोटींचा खर्च महापालिका करणार आहे. या प्रकल्पातील पहिल्या टप्प्याच्या खर्चासाठी महापालिकेने दोनशे कोटींचे कर्जरोखे २७ जुलै २०२३ रोजी काढले आहे.

# मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानामध्ये पालिकेच्या क्रिडा प्रबोधिनी विद्यालयाचा द्वितीय क्रमांक..!

**। पिंपरी-चिंचवड।**

राज्य सरकारच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियान राबविण्यात आले. या अभियानामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रिडा प्रबोधिनी विद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला आहे.आयुक्त शेखर सिंह म्हणाले, राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या तसेच सर्व माध्यमांच्या शाळांमधील शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी आणि विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी तसेच स्पर्धात्मक वातावरण निर्माण व्हावे यासाठी राज्य शासनाच्या वतीने 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हे अभियान राबविण्यात आले. या अभियानातंर्गत राज्यातील अ आणि ब वर्ग महानगरपालिका गटात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा प्रबोधिनी विद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवण्याचे काम केले आहे.या अभियानाचा बक्षिस वितरण समारंभ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, प्रधान सचिव रणजीत सिंह देवल यांच्या शुभहस्ते टाटा थिएटर नॅशनल सेंटर फोर परफॉर्मिंग आर्ट्स नरिमन पॉईंट मुंबई या ठिकाणी संपन्न झाला. वतीने शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगीता बांगर-घोडेकर तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक जयराम वायळ, माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष अंकुश चव्हाण यांनी राज्यस्तरीय द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारले. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानातंर्गत शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये शाळा व परिसराचे सौंदर्यीकरण, विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमांमधील तसेच व्यवस्थापनातील व निर्णय प्रक्रियेतील सहभाग, शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक अवांतर उपक्रम, शाळेची इमारत व परिसराची स्वच्छता, राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहन देण्याबाबतचे उपक्रम अशा विविध बाबींचा समावेश होता. या बाबींच्या आधारे शाळांनी केलेल्या या कामगिरीचे केंद्र, तालुका, जिल्हा, विभाग व राज्यपातळीवर काटेकोरपणे मुल्यांकन करण्यात आले. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाला अभियानामध्ये महाराष्ट्रातील १० हजारांपेक्षा जास्त शाळांनी सहभाग नोंदविला. या अभियानाच्या माध्यमातून शाळांमध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारचे विद्यार्थ्यांच्या संवर्धनासाठीचे उपक्रम, शालेय व्यवस्थापन समितीने शाळेच्या सक्रिय विकासात सहभाग घेण्यासाठी घेतलेले उपक्रम, सामाजिक बांधिलकीचे उपक्रम असे अनेक कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये विद्यार्थी शिक्षकांनी उस्फुर्त प्रतिसाद दर्शवला आणि महापालिका शाळेस हे यश प्राप्त झाले, अशी माहिती शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांनी दिली.

# पंतप्रधान मोदींचा मेट्रोला हिरवा झेंडा!

## पिंपरी-चिंचवड ते निगडी मार्गाचे भूमिपूजन

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवारी पिंपरी-चिंचवड महापालिका ते निगडी या विस्तारित मेट्रो मार्गाचे भूमिपूजन करण्यात आले. याचवेळी रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मेट्रो मार्गाला पंतप्रधानांनी हिरवा झेंडा दाखवला. पंतप्रधानांनी कोलकता येथून विविध प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन केले. यावेळी त्यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड मधील या मेट्रो प्रकल्पांची ऑनलाईन प्रणालीद्वारे सुरुवात केली. या कार्यक्रमासाठी सह्याद्री अतिथीगृह येथून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हेही सहभागी झाले होते. पंतप्रधान लोकार्पण करत असलेल्या पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक ते रामवाडी हा मेट्रो मार्ग ५.५ किलोमीटरचा असून ५ फेब्रुवारीला या मार्गावर मेट्रोची चाचणी झाली होती. यापूर्वी ६ मार्च २०२२ रोजी पिंपरी-चिंचवड महापालिका ते फुगेवाडी या ७ किलोमीटर आणि वनाज ते गरवारे ५ किलोमीटर मेट्रो मार्गाचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आले होते. फुगेवाडी ते जिल्हा न्यायालय ६.९१ किलोमीटर आणि गरवारे ते रुबी हॉल ४.७५ किलोमीटर अशा विस्तारित मेट्रोच्या टप्प्यांचे लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते १ ऑगस्ट २०२३ रोजी करण्यात आले होते.पंतप्रधानांच्या हस्ते बुधवारी रुबी हॉल क्लिनिक ते रामवाडी या ५.५ किलोमीटर मार्गाचे लोकार्पण करण्यात आले. तसेच, पंतप्रधानांच्या हस्ते पिंपरी-चिंचवड महापालिका ते निगडी या पहिल्या टप्प्यातील विस्तारित मेट्रो मार्गाचे भूमिपूजनही करण्यात आले. हा मार्ग ४.४ किलोमीटरचा असून पूर्णपणे उन्नत मार्ग आहे. यामुळे स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड हा मार्ग निगडीपर्यंत विस्तारित होणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवारी पिंपरी-चिंचवड महापालिका ते निगडी या विस्तारित मेट्रो मार्गाचे भूमिपूजन करण्यात आले. याचवेळी रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मेट्रो मार्गाला पंतप्रधानांनी हिरवा झेंडा दाखवला. पंतप्रधानांनी कोलकता येथून विविध प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन केले.



> “वाढत्या शहरीकरणामुळे स्मार्ट आणि दर्जेदार वाहतुकीची गरज आहे. मेट्रो सेवेमुळे ही गरज पूर्ण होऊन इंधन आणि वेळेत देखील मोठी बचत होणार आहे. मोदींची गॅरंटी असलेले सर्व प्रकल्प आणि विकास कामे गतीने सुरू असल्यामुळे महाराष्ट्राला मोठा फायदा होत आहे.
>
> – एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

> “प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात पुण्यातील पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळाली आहे. आज लोकार्पण झालेल्या रुबी हॉल ते रामवाडी मेट्रो मार्गामुळे वनाज ते रामवाडी हा मेट्रो प्रवास अधिक सुलभ होईल. पिंपरी-चिंचवड ते निगडी टप्पा १ मार्गाचे काम सुरू होत असल्याने भविष्यात पिंपरी-चिंचवड शहरालाही याचा फायदा होणार आहे.
>
> – अजित पवार,
> उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री पुणे

# शहर पोलिस दलातील १३ पोलिस निरीक्षकांच्या बदल्या रद्द

## निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केल्या होत्या बदल्या

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील १३० पोलिस निरीक्षकांच्या इतर घटकांमध्ये बदल्या केल्या होत्या. त्याबाबत काही अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणकडे (मॅट) धाव घेतली होती. मॅटच्या आदेशानंतर बदली झालेल्या ६५ पोलिस निरीक्षकांच्या बदल्या रद्द केल्या. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड पोलिस दलातील १३ पोलिस निरीक्षकांचा समावेश आहे.मॅटने राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना बदली आदेशाची पडताळणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार २१ फेब्रुवारी रोजी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी संबंधित घटक प्रमुखांची बैठक घेतली. त्यानंतर पुणे शहर (२), पिंपरी-चिंचवड (१३), ठाणे शहर (७), विशेष पोलिस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र (१) अशा एकूण २३ पोलिस निरीक्षक जे २१ डिसेंबर २०२३ रोजी संबंधित घटकात कार्यकारी पदावर कार्यरत होते. त्यांना आयोगाच्या निकषाप्रमाणे जिल्ह्याबाहेर बदली करण्यापासून सवलत असल्याचे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले.मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर महासंचालक कार्यालयाकडून देखील ४२ पोलिस निरीक्षकांची बदलीबाबत पडताळणी केली. त्यानंतर एकूण ६५ पोलिस निरीक्षकांची बदली रद्द करण्याचे आदेश दिले. अपर पोलिस महासंचालक (आस्थापना) संजीव कुमार सिंघल यांनी याबाबतचे आदेश दिले.शंकर डामसे, शैलेश गायकवाड, शंकर बाबर, ज्ञानेश्वर साबळे, दीपाली धाडगे, प्रसाद गोकुळे, सुनील पिंजण, विश्वजित खुळे, बाळकृष्ण सावंत, दीपक साळुंखे, शहाजी पवार, अरविंद पवार, अनिल देवडे. पिंपरी-चिंचवड पोलिस दलात इतर घटकातून बदलून आलेल्या १३ अधिकाऱ्यांची बदली रद्द झाली. यात नागपूर शहर दलातील पोलिस निरीक्षक वैजयंती मांडवधरे, विश्वनाथ चव्हाण, विनोद चौधरी, बापू ढेरे, दीपक गोसावी, अमित डोळस, संग्राम शेवाळे, अमोल देशमुख, राजेंद्रकुमार सानप, बबन येडगे, भारत कन्हाडे, तसेच ठाणे शहर दलातील निरीक्षक मनोज शिंदे आणि डीआयजी गडचिरोलीचे पोलिस निरीक्षक अमोल फडतरे यांची पिंपरी-चिंचवड दलात बदली झाली होती.



# नव्या योजना की जुन्या प्रकल्पांना मुलामा?

## महापालिकेचे आज अंदाजपत्रक; दहा हजार कोटींच्या ‘विक्रमा’ची शक्यता

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आगामी आर्थिक वर्षासाठीचे (२०२४-२५) महापालिकेचे अंदाजपत्रक आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्याकडून गुरुवारी मांडण्यात येणार आहे. अंदाजपत्रक दहा हजार कोटींचा टप्पा ओलांडण्याची शक्यता असून समान पाणीपुरवठा योजना, नदीसुधार प्रकल्प, उड्डाणपूल यांच्यासह शहराला कोणती नवी योजना मिळणार, याबाबत महापालिका वर्तुळात उत्सुकता आहे. दरम्यान, उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी परिस्थिती असल्याने जुन्या योजनाच पूर्ण करण्याला प्राधान्य देण्यात येण्याची शक्यता असून नव्या योजना अपवादानेच मांडल्या जातील, अशी चर्चा आहे.सलग दुसऱ्या



वर्षी अंदाजपत्रक उशिरा सादर होत आहे. मात्र महापालिकेत प्रशासकीय राजवट असल्याने स्थायी समितीला अंदाजपत्रक मांडल्यानंतर स्थायी समिती आणि मुख्य सभेच्या मान्यतेची केवळ औपचारिकता राहणार असून एक एप्रिलपासून त्याची अंमलबजावणी सुरू होणार आहे.महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी चालू आर्थिक वर्षासाठीचे ९ हजार ५६६ कोटींचे अंदाजपत्रक गेल्या वर्षी मार्च महिन्यात मांडले होते. त्यामध्ये जुन्या योजना पूर्ण करण्यास प्राधान्य दिले होते. यावेळीही जुन्या योजनाच मांडल्या जाण्याची दाट शक्यता अधिकारी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे. शहरात सध्या मेट्रो मार्गिकांची कामे, जायका प्रकल्प, मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण योजना, समान पाणीपुरवठा योजनेसह उड्डाणपुलांची कामे सुरू आहेत. या सर्व महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी हजारो कोटींचा खर्च होणार आहे. या योजनांची कामे सध्या सुरू आहेत. त्यामुळे या प्रकल्पांसाठी भरीव आर्थिक तरतूद केली जाईल. चालू आर्थिक वर्षात महापालिकेला मिळालेले उत्पन्न आणि खर्चाचा विचार करता अंदाजपत्रकात गृहीत धरलेले उत्पन्न प्राप्त करण्यासाठी महापालिकेला तारेवरची कसरत करावी लागली आहे. त्यामुळे आगामी अंदाजपत्रकामध्येही १ हजार ५०० ते १ हजार ७०० कोटींची अंदाजपत्रकीय तूट येण्याची शक्यता आहे. या परिस्थितीत आयुक्तांना उत्पन्न आणि खर्चाचा मेळ साधण्याचे आव्हान आयुक्तांपुढे असणार आहे. आगामी आर्थिक वर्षात मिळकतकरामध्ये वाढ होणार नसल्याने उत्पन्नासाठी पारंपरिक आर्थिक स्रोतांवरच अवलंबून राहावे लागणार आहे. मिळकतकर, बांधकाम विभागाबरोबरच शासकीय अनुदान, थकबाकी वसुली यावरच उत्पन्नाचा डोलारा उभा राहणार आहे.

### प्रकल्पांसाठी हजारो कोटींचा खर्च

**» मात्र महापालिकेत प्रशासकीय राजवट असल्याने स्थायी समितीला अंदाजपत्रक मांडल्यानंतर स्थायी समिती आणि मुख्य सभेच्या मान्यतेची केवळ औपचारिकता राहणार असून एक एप्रिलपासून त्याची अंमलबजावणी सुरू होणार आहे.महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी चालू आर्थिक वर्षासाठीचे ९ हजार ५६६ कोटींचे अंदाजपत्रक गेल्या वर्षी मार्च महिन्यात मांडले होते. त्यामध्ये जुन्या योजना पूर्ण करण्यास प्राधान्य दिले होते. यावेळीही जुन्या योजनाच मांडल्या जाण्याची दाट शक्यता अधिकारी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे. शहरात सध्या मेट्रो मार्गिकांची कामे, जायका प्रकल्प, मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण योजना, समान पाणीपुरवठा योजनेसह उड्डाणपुलांची कामे सुरू आहेत. या सर्व महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी हजारो कोटींचा खर्च होणार आहे.**

# मेट्रो स्थानकापासून लोहगाव विमानतळापर्यंत पीएमपीची सेवा

## अंतरानुसार पाच ते दहा रुपये तिकीट दर करण्यात आला निश्चित

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** प्रवाशांच्या सोयीसाठी रामवाडी मेट्रो स्थानक ते लोहगाव विमानतळ या दरम्यान पीएमपीकडून पूरक सेवा (फिडर सेवा) देण्यास सुरुवात झाली आहे. या सेवेअंतर्गत दर पंचवीस मिनिटांनी गाड्या सोडण्यात येणार असून अंतरानुसार पाच ते दहा रुपये तिकीट दर निश्चित करण्यात आला आहे. मेट्रो प्रकल्पाअंतर्गत रूबी हॉल ते रामवाडी या दरम्यानची मेट्रोची



प्रवासी सेवा बुधवारपासून सुरू करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाइन पद्धतीने या सेवेचे उद्घाटन केले. त्यानंतर पीएमपीच्या पूरक सेवेला तातडीने प्रारंभ करण्यात आला. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, खासदार प्रा. मेधा कुलकर्णी, आमदार सुनील टिंगरे, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, माजी आमदार जगदीश मुळीक आणि बापूसाहेब पठारे यावेळी उपस्थित होते.या पूरक सेवेअंतर्गत विजेवर धावणाऱ्या गाड्यांच्या माध्यमातून सेवा दिली जाणार आहे. या गाड्या वातानुकूलीत असून त्याचे तिकीट दरही निश्चित करण्यात आले आहेत. अंतरानुसार पाच रुपये ते दहा रुपये असा तिकीट दर असून दर पंचवीस मिनिटांनी या मार्गावर गाड्या धावणार आहेत, अशी माहिती पीएमपी प्रशासनाकडून देण्यात आली. या सेवेमुळे प्रवाशांना मेट्रो स्थानकापर्यंत पोहोचणे सोयीचे होणार असून प्रवासी संख्या आणि उत्पन्नात वाढ झाल्यानंतर या मार्गावरील गाड्यांची संख्या वाढविण्याचे नियोजित आहे. रामवाडी मेट्रो स्थानक ते लोहगाव विमानतळ (सोकोरे नगर मार्गे) या मार्गावरील पूरक सेवेत हयात हॉटेल, वेकफिल्ड कंपनी, साकोरे नगर, नेक्सा शोरूम, विमाननगर लेन क्रमांक २१ आणि २२, क्रोमा मॉल असे थांबे असणार आहेत. तर संजय पार्क लेन क्रमांक ६ मार्गे धावणाऱ्या गाडीचा मार्ग लोहगाव विमानतळ, क्रोमा मॉल, सिंबायोसिस कॉलेज, विमाननगर, संजय पार्क लेन क्रमांक ६, मारुती सुझुकी शोरूम, साकोरे नगर, चेक-मेट हॉटेल, रामवाडी असा असेल.

# भाजपला प्रादेशिक पक्ष संपविण्याची आसुरी महत्वकांक्षा

## आम्ही ६० वर्षाचे झालो,तरी आम्हाला संधी मिळाली पाहिजे: खा.अमोल कोल्हे

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आगामी लोकसभा निवडणुकीला काही दिवस शिल्लक राहिले आहेत.पण भाजपकडून पहिली यादी जाहीर केली आहे.त्यामुळे इतर पक्ष देखील लवकरच उमेदवाराच्या नावाच्या याद्या जाहिर करतील अशी शक्यता आहे.त्यामध्ये महाराष्ट्र मध्ये भाजप,शिवसेना आणि राष्ट्रवादी अशी महायुती आहे.या तीन पक्षा च्या जागा वाटपाबाबत अद्यापपर्यंत अंतिम संख्या ठरलेली नाही.पण महायुतीमधील शिवसेना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला ८ आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार गटाला ३ जागा मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्या जागा वाटपाबाबत शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांना विचारले असता ते म्हणाले की, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात ज्यावेळी फुट पाडण्याचा प्रयत्न झाला.त्यावेळी



एक गोष्ट निश्चित झाली होती.ती म्हणजे केंद्रातील भाजप सरकारला प्रादेशिक पक्ष संपविण्याची आसुरी महत्वकांक्षा असल्याच स्पष्ट झाले होते.आता लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपात एकनाथ शिंदे गटाला ८ आणि अजित पवार गटाला ३ एवढय़ाच जर जागा मिळत असतील, तर त्यांच्या प्रत्येक कार्यकर्त्यांच्या मनामध्ये एक प्रश्न पडत असेल की,याचसाठी केला होता का अट्टहास अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांना त्यांनी सुनावले.तसेच ते पुढे म्हणाले की,आपण स्वगृही होता. त्यावेळी राजासारखी वागणूक होती.

आता जर ८ आणि ३ जगावर बोळवण केली जात असेल तर एवढा प्रवास केल्याचे फलित काय असा सवाल उपस्थित करीत पुन्हा एकदा अजित पवार यांना टोला लगावला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीनंतर शरद पवार आणि अजित पवार या दोन्ही नेत्यांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मागील सात महिन्यापासून दररोज आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळत आहे.तर लोकसभा निवडणुकीला अगदी काहीच दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला आहे.त्याच दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांची दोन दिवसांपूर्वी मंचर येथे मेळावा पार पडला.त्यावेळी शरद पवार आणि अमोल कोल्हे यांच्यावर अजित पवार यांनी टीका केली होती.त्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.या सर्व घडामोडी दरम्यान खासदार अमोल कोल्हे हे पुणे दौर्यावर होते.त्यावेळी अजित पवार यांनी मंचर येथील सभेत तुमच्यावर वैयक्तिक पातळीवर टीका केली.त्या प्रश्नावर अमोल कोल्हे यांनी उत्तर देताना म्हणाले की,आम्ही ६० वर्षाचे झालो,तरी आम्हाला संधी मिळाली पाहिजे,अशी भूमिका मांडत अजित पवार यांच्यावर टीका केली. तसेच ते पुढे म्हणाले की,दादा मोठे नेते आहेत.माझ्यावर त्यांनी जी वैयक्तिक टीका केली आहे.त्यावर मी एकच सांगेन की,मागील पाच वर्षातील माझ्या कामाचा लेखाजोखा असून त्याबद्दल जनताच सांगेल,त्याचबरोबर मी त्यांच्या वैयक्तिक टिकेला बांधिल नसून माझे नेते शरद पवार हे आहेत.तसेच त्याच सभेत शरद पवार यांच्यावर देखील टीका करण्यात आली.

शरद पवार हे २०१४ पासून कोणत्याही सत्तेच्या पदावर नाहीत.त्यामुळे आम्ही ६० वर्षाचे झालो,तरी आम्हाला संधी मिळाली पाहिजे.तर तुम्हाला इतकी वर्ष संधी कोणी दिली.उपमुख्यमंत्री पद कोणी दिल, २०१९ मध्ये जो काही प्रकार झाला होता.सकाळचा शपथविधी झाल्यावर देखील मन मोठ करून पुन्हा संधी कोणी दिली होती अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर त्यांनी निशाणा साधला.पण महायुतीमधील शिवसेना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला ८ आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार गटाला ३ जागा मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# आघाडीतील कोणत्याही पक्षाला दुखविले जाणार नाही

## ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची सुप्रिया सुळेंकडे मागणी

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शिवसैनिक हा आदेश पाळणारा आहे. तो एकनिष्ठ आहे. फाटका-तुटका आहे, मात्र त्याचा आत्मसन्मान जपा, शिवसैनिकाला विश्वासात घ्या, अशी अपेक्षा ठाकरे गटाच्या जिल्हा आणि तालुका प्रमुखांनी बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे व्यक्त केली. महाविकास आघाडीचे सरकार असतानाही जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अपेक्षित निधी मिळाला नाही. दौऱ्यात, मेळाव्यांच्या नियोजनात सहभागी करून घेतले जात नाही, अशी खंतही यावेळी व्यक्त करण्यात आली. दरम्यान, आघाडीतील कोणत्याही पक्षाला दुखविले जाणार नाही. विश्वासात घेतले जाईल. सन्मान दुखावेल,



असे काही होणार नाही. त्यासाठी आघाडीतील प्रमुख पक्षांच्या प्रत्येकी एक-एक प्रतिनिधींची मिळून समन्वय समिती स्थापन करण्यात येईल, असे आश्वासन सुळे यांनी दिले.आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाकडून बारामती लोकसभा मतदारसंघातील जिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख, विभाग प्रमुख, शहर प्रमुख, आजी-माजी प्रमुख पदाधिकारी यांची बैठक झाली. खासदार सुप्रिया सुळे, ठाकरे गटाचे संपर्क प्रमुख सचिन आहिर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, ठाकरे गटाचे शहर प्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे यांच्यासह अन्य प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी जिल्हा प्रमुख, तालुका प्रमुखांनी त्यांच्या भावना खासदार सुळे यांच्यापुढे मांडल्या.बारामती लोकसभा मतदारसंघात शिवसेनेची ताकद आहे. शिवसेनेचे या मतदारसंघात साडेतीन लाखांपेक्षा जास्त मतदान आहे. ही सर्व ताकद सुळे यांच्या पाठीशी असेल. सुळे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणले जाईल. त्यामध्ये शिवसैनिकांची महत्त्वाची भूमिका असेल. शिवसैनिक आदेश पाळणार आहे.